दिनांक 19/04/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 4

विषय – विटा नगरपरिषद आरोग्य विभागासाठी दुर्गंधीनाशक खरेदी करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरिक्षक यांची दिनांक 12/04/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

विटा नगरपरिषद घनकचरा व्यवस्थापन भूमी येथे कच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया केली जाते. त्याठिकाणी दररोज 40-45 कर्मचारी काम करीत असतात. कचरा प्रक्रिया करीत असताना मोठ्या प्रमाणात कच-याची दुर्गंधी पसरत असते. तसेच शहरामधील मृत प्राणी घनकचरा व्यवस्थापन भूमी येथे आणले जाते. त्यांची दुर्गंधी देखील परिसरामध्ये पसरली जाते. या दुर्गंधीचा त्रास सदर ठिकाणी काम करणा-या कर्मचा-यांना होवून त्याचा परिणाम कर्मचा-यांच्या आरोग्यावर होत आहे. कच-यामुळे पसरणारी दुर्गंधी कमी करण्यासाठी दुर्गंधीनाशक फवारणी करणे आवश्यक आहे. तसेच विटा नगरपरिषदेचे अद्यावत असे फिश मार्केट असून त्याठिकाणी माशांमुळे पसरणारी दुर्गंधी कमी करण्यासाठी देखील दुर्गंधीनाशक फवारणी उपयुक्त आहे. तसेच सदर दुर्गंधीनाशक फवारणी सार्वजनिक शौचालय, मुतारी येथे केलेस सदर ठिकाणी दुर्गधी पसरणार नाही. त्यासाठी विटा नगरपरिषद आरोग्य विभागासाठी दुर्गंधीनाशक खरेदी करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी अर्थसंकल्प 2023-24 मध्ये तरतूद र.रू. 10.00 लक्ष इतकी धरणेत आलेली आहे. या कामावर मागील वर्षी र.रू.0.00 लक्ष इतका खर्च झालेला आहे. याकामी अपेक्षित खर्च र.रू.6.00 लक्ष अंदाजीत आहे.

तरी विटा नगरपरिषद आरोग्य विभागासाठी दुर्गंधीनाशक खरेदी करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा